लघु व मध्यम उद्योगांत प्राथमिक ऊर्जा परीक्षणाची योजना राबविण्यास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.अपाऊ २०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १३ जानेवारी, २०११.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य असून, राज्याच्या सन २००९-१० च्या आर्थिक पहाणी अहवालानुसार एकूण वीज वापराच्या ३७ टक्के वीज उद्योग क्षेत्रात वापरली जाते. तज्ञांच्या अहवालानुसार राज्यामध्ये उद्योग, कृषी, घरगुती आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये २५ ते ३० टक्के ऊर्जा संवर्धनास वाव आहे. लघु व मध्यम उद्योगातही ऊर्जा कार्यक्षमतेत वाढ केल्यास मोठ्या प्रमाणावर ऊर्जा बचत करता येईल. मोठ्या प्रमाणावर लघु व मध्यम उद्योगांची व्याप्ती तसेच त्यात ऊर्जा संवर्धनाचे महत्व लक्षात घेता, या क्षेत्रात ऊर्जा संवर्धन कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. त्याकरिता लघु व मध्यम उद्योगांना ऊर्जा बचतीसाठी असलेला वाव लक्षात आणून देणे व जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी लघु व मध्यम उद्योगांत प्राथमिक ऊर्जा परीक्षणाची योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय --**

राज्यातील लघु व मध्यम उद्योगांत ऊर्जा संवर्धनासाठी असलेला वाव व ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व लक्षात घेता त्यासाठी प्राथमिक ऊर्जा परीक्षणाच्या योजनेचा उद्देश, योजनेची माहिती व परिमाण, इ. बाबी विचारात घेता आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यासाठी खालीलप्रमाणे योजनेस मंजुरी देण्यात येत आहे.

अ) **योजनेचा उद्देश --**

राज्यातील लघु व मध्यम उद्योगामध्ये ऊर्जा संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यासाठी लघु व मध्यम उद्योजकांना प्राथमिक ऊर्जा परिक्षण करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर उद्योजकांनी प्राथमिक ऊर्जा परीक्षण केल्यास ऊर्जा बचतीसाठी असलेला वाव लक्षात येऊन तपशीलवार ऊर्जा परीक्षण करतील. तसेच अल्पगुंतवणूक करुन ऊर्जा बचतीसाठीच्या उपाययोजना त्यांना हाती घेता येतील. लघु व मध्यम उद्योजक, त्यांचे अभियंते व कामगार यांच्यामध्ये समन्वय होऊन ऊर्जा बचती विषयी जागृती निर्माण होईल.

**ब) योजनेची तांत्रिक माहिती व परिमाण –**

नोंदणीकृत लघु व मध्यम उद्योजकांनी करुन घ्यावयाचे प्राथमिक ऊर्जा परीक्षण, हे महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (महाऊर्जा) यांच्या सल्ल्यानुसार व त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या उर्जा परीक्षण सल्लागार कंपन्यांकडून करण्यात येईल. त्याकरिता करावयाच्या प्राथमिक ऊर्जा परिक्षणाचा नमुना अहवाल महाऊर्जाने निश्चित करुन, महाऊर्जा प्राथमिक ऊर्जा परिक्षण करण्याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचनाही निर्गमित करील. तसेच नोंदणीकृत असलेल्या सल्लागारांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची महाऊर्जामार्फत छाननी करण्यात येईल.

**क) योजनेची अंमलबजावणी -**

१) लघु व मध्यम उद्योगात प्राथमिक ऊर्जा परिक्षण करण्याच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाऊर्जाकडे नोंदणीकृत असलेल्या ऊर्जा परिक्षण कंपन्या/ सल्लागार/ तज्ञांमार्फत योजनेचा प्रचार व प्रसार केला जाईल. नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण कंपन्यांव्दारे योजनेची अंमलबजावणी केली जाईल. सदर योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक लघु व मध्यम उद्योजकांनी त्यांचा प्रस्ताव नोंदणीकृत असलेल्या तज्ञ ऊर्जा परिक्षण कंपन्या/ सल्लागार/ तज्ञांमार्फत महाऊर्जाकडे सादर करण्यात यावा. प्रथम येणा-या लघु व मध्यम उद्योगास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार महाऊर्जाकडून कार्यवाही करण्यात येईल. तसेच महाऊर्जाने या संदर्भात निकष व तांत्रिक बाबी निश्चित करुन केलेल्या निकषाच्या आधारे महाऊर्जामार्फत आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

२) लघु व मध्यम उद्योजकांनी नोंदणीकृत सल्लागारांकडून प्राथमिक ऊर्जा परिक्षण करण्याकरिता एकावेळी अंदाजित रु. ५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजित खर्चापैकी रु. ३,०००/- पर्यंतचे आर्थिक सहाय्य महाऊर्जामार्फत, नोंदणीकृत सल्लागारास उपलब्ध करुन दयावयाचे असून, सदर योजनेत सहभाग घेणा-या लघु व मध्यम उद्योजकांनी रु. २०००/- हा लाभार्थी हिस्सा म्हणून नोंदणीकृत सल्लागारास उपलब्ध करुन दयावयाचा आहे.

३) उपरोक्त योजना राबविण्यासाठी महाऊर्जामार्फत आर्थिक तरतूद अर्थसंकल्पित होण्याकरिता कार्यवाही करण्यात येईल.

ड. आर्थिक तरतूद –

सदर योजना सन २०१०-११ पासून राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून, यासाठी होणारा खर्च " २८१०-वीज- अपारंपारिक ऊर्जा साधने "या मुख्य लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. दि. पारधी )
प्रभारी अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई.( पत्राने )
महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमर्शियल कॉम्पलेक्स, त्रिदलनगरसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६
प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय,मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव,( सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( नियोजन ), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( महसूल ),मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव( वने),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( वित्त), मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( उद्योग ), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ( आदिवासी ) मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव ( नगरविकास-२ ), मंत्रालय,मुंबई.
सचिव( ग्राम विकास ) मंत्रालय, मुंबई.
सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग),मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव ,मा. मंत्री( अपाऊ), मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री, मंत्रालय,मुंबई.
सर्व परवानाधारक कंपन्या.
विकास आयुक्त,( उद्योग ) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,अंधेरी, मुंबई.
मुख्य अभियंता ( विद्युत ) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर ( पूर्व), मुंबई-७१.
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१